*Ambegaon Taluka Vidya Vikas Mandal's*

**B. D. KALE MAHAVIDYALAYA, GHODEGAON**

**FACULTY OF SCIENCE**

**ANNUAL REPORT 2023 – 2024**

---

## ❖ ग्रंथालय भेट-

ग्रंथालय जितके सुसज्ज असेल, तितकी महाविद्यालयाची प्रगती चांगली होती. ग्रंथालयाचा मूळ उद्देश ज्ञान व माहिती संग्रहण हा असतो. प्रथम वर्ष विज्ञान या वर्गात नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचा आत्मा समजल्या जाणाऱ्या ग्रंथालयाची माहिती देणे हे महत्वाचे आहे. म्हणून सदर वर्गातील विद्यार्थ्यांची १२ सप्टेंबर २०२३ रोजी महाविद्यालयाच्या ग्रंथालयात भेट देण्यात आली. ओळख, तेथील पुस्तके, मासिके, संदर्भ ग्रंथ, वाचनपत्रे, वर्तमानपत्रे इ. गोष्टींची माहिती देण्यात आली.

ग्रंथालयाचे ग्रंथपाल प्रा. कैलास उंबरे यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. ग्रंथालयातील विविध सुविधा यामध्ये Computer lab, Library card, Daily newspaper व INFLIBIT N-LIST software याबद्दल देखील विद्यार्थ्यांना संपूर्ण माहिती देण्यात आली; जेणेकरून विद्यार्थी या सर्व सुविधांचा पुरेपूर वापर करतील. यावेळी एकूण ३४ विद्यार्थी व ७ शिक्षक सहभागी होते. या भेटीचे आयोजन विज्ञान विभाग समन्वयक प्रा. रविंद्र वाळे व ग्रंथालयाचे ग्रंथपाल प्रा. कैलास उंबरे यांनी केले.

## ❖ ४ थे रानभाज्या व रानफळे महोत्सव-

जागतिक आरोग्य संघटनेने २०२३ हे वर्ष तृणधान्य वर्ष म्हणून घोषित केले. याच पार्शवभूमीवर वनस्पती विभागाकडून दि. २६ /०९/२०२३ रोजी ४ थ्या रानभाज्या व रानफळे महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाचे उदघाटन आंबेगाव तालुका कृषी अधिकारी मा. संजना इंगळे यांनी केले. त्यांनी आपल्या उदघाटनपर भाषणात भरडधान्य, तृणधान्य व रानभाज्यांची महत्त्व पटवून दिले. ५० भाज्यांची माहिती देणारे पोस्टर विद्यार्थ्यांनी प्रदर्शनात सादर केले होते. या प्रदर्शनात जंगलातील, शेताच्या बांधावरील तसेच माळरानातील चिभडु, आशिंद, आंबोशी, भोकर, हादगा, चिंचुर्डी, चाव्याचा बार इ. एकूण ७३ विविध रानभाज्या व रानफळे यांचे प्रदर्शन दाखविण्यात आले.

सदर महोत्सवाप्रसंगी कार्यक्रमाचे व संस्थेचे अध्यक्ष श्री. तुकाराम काळे, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन श्री. ॲड. मुकुंदराव काळे, संस्थेचे सर्व संचालक व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व इतर मान्यवर उपस्थित होते. वनस्पती विभागाच्या प्रमुख प्रा. अर्चना औताडे यांनी निवेदन तर प्रा. मृणाली लोणकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. राजश्री फलके यांनी आभार मानले.

## ❖ NATIONAL WILDLIFE WEEK 2023-

The Department of Zoology of B. D. Kale Mahavidyalaya, Ghodegaon celebrated "National Wildlife Week" programme on 8th October 2023. The programme aimed to crates awareness among the students to protect biodiversity around them. National Wildlife Week celebrated by conducting the following activities like Essay Writing competition, Build a Bird Nest competition and Painting competition for students to create consciousness in favour of wildlife preservation. In this exhibition total 97 students were participated.

In welcome address, Prof. Ravindra Wale, Head Department of Zoology explained the objectives of the celebration and highlighted different initiatives taken by the govt. for conservation and to increase the population of wildlife.

For this programme, Principal of the college Prof. Dr. Dnyaneshwar Walhekar was present. In his address he described the role of nature and importance of wildlife.

For this programme college teaching and non-teaching staff were present.

The programme was organized and introduced by Prof. Ravindra Wale. Prof. Vishwas Kokane proposed vote of thanks.

## ❖ वाचन प्रेरणा दिन:-

भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिन राज्यभरात "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. वाचन प्रेरणा व संस्कृतीचा विकास ही एक सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. ज्ञानसंपन्न व माहितीसमृद्ध समाजाची घडण, व्यक्तिमत्त्व विकास, साहित्य विकास आणि भाषाविकास यांसाठी वाचन संस्कृतीचा विस्तार आणि विकास करणे अत्यावश्यक आहे.

अवांतर वाचनामुळे विद्यार्थ्यांना अनेक संदर्भ मिळतात, त्यांची आकलन शक्ती वाढते तसेच इतरांवर आपल्या ज्ञानाचा प्रभाव टाकण्यासाठीही अवांतर वाचनाचा उपयोग होतो. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची आवड निर्माण होण्याचे उद्दिष्ट वाचन प्रेरणा दिनाच्या माध्यमातून साध्य करण्यासाठी प्राणीशास्त्र विभाग व ग्रंथालय विभागाच्या वतीने १५ ऑक्टोबर २०२३ हा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला.

या उपक्रमात एकूण ६३ विद्यार्थ्यांनी व ११ शिक्षकांनी सहभाग घेतला. या उपक्रमात विद्यार्थी व शिक्षक यांनी कथा, कादंबरी, आत्मचरित्रे, मासिके, संदर्भ ग्रंथ, अशा विविध पुस्तकांचे वाचन केले. या कार्यक्रमाचे आयोजन विज्ञान विभागातील प्राणिशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. रविंद्र वाळे यांनी केले.

## ❖ अभ्यास सहल जानेवारी २०२४-

विज्ञान विभागातील प्राणीशास्त्र विभागाने गुरुवार दि. १८/१/२०२४ ते शुक्रवार दि. १९/१/२०२४ रोजी (दोन दिवसीय, १ मुक्काम) रेशीम जिल्हा केंद्र, वाई (जि. सातारा) मॅप्रो गार्डन, मध संचालनालय, खादी व ग्रामोद्योग केंद्र, महाबळेश्वर (जि. सातारा) व हर्णे फिश बंदर (दापोली) येथे अभ्यास सहल आयोजित केली होती. विद्यार्थ्यांना रेशीम उद्योगाबद्दल व मधमाशीपालनाबद्दल ज्ञान

मिळावे व त्यांच्यामध्ये रेशीम कीटक पालन व मधमाशी पालन करण्याची उत्सुकता निर्माण व्हावी, यासाठी या अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर अभ्यास सहलीत विद्यार्थ्यांना रेशीम कीटक पालन व मधुमक्षिका पालन प्रशिक्षण, विविध योजना व रेशीम उद्योगासाठी मिळणारे अनुदान तसेच हर्णे फिश बंदर येथे विविध खाऱ्या पाण्यातील मासे, त्यांची मासेमारी, त्यांच्या लिलाव पद्धती, खरेदी विक्री, याबद्दल सविस्तर मार्गदर्शन मिळाले.

ही अभ्यास सहल विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण व उपयोगी ठरली आहे. सदर अभ्यास सहलीमध्ये एकूण ३९ विद्यार्थी, ४ शिक्षक (एकूण ४३) सहभागी झाले होते. या अभ्यास सहलीचे आयोजन विज्ञान विभागातील प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. रविंद्र वाळे यांनी केले.

CO-ORDINATOR
SCIENCE FACULTY
B. D. Kale Mahavidyalaya
Ghodegaon, Dist.Pune